**एल.ए.आर.क्र. ३२०/२०२१**

**CNRNoMHOS120003342021**

**बिभीषण वि. महाराष्ट्र शासन**

**नि.क्र.१४ खालील आदेश**

**(आदेश दि.१६/०३/२०२२)**

१. प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदारांतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ आणि आदेश २२ नियम ३ अन्वये मयत अर्जदार बिभीषण श्रीपती काळे यांचे वारस अभिलेखावर घेण्यात यावे या विनंतीसह दाखल केलेला आहे. अर्जातील कथनांप्रमाणे प्रस्तुत अर्जातील अर्जदार बिभीषण श्रीपती काळे हे दि.२६/१२/२०१८ रोजी मयत झालेले आहेत. मयत बिभीषण श्रीपती काळे यांना खालीलप्रमाणे वारस आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | राजुबाई बिभीषण काळे | पत्नी |
| २. | बिरबल बिभीषण काळे | मुलगा |
| ३. | सुवर्णा बापू हावरे | मुलगी |
| ४. | रेखा अण्णासाहेब बरकडे | मुलगी |

०२. मी सदर अर्जावर युक्तीवाद ऐकलेला आहे.

०३. प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार बिभीषण श्रीपती काळे हे दि.२६/१२/२०१८ रोजी मयत झालेले असून अर्जासोबत मयत अर्जदार बिभीषण श्रीपती काळे यांचे मृत्यु प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे. मयत अर्जदार बिभीषण श्रीपती काळे यांचे वारसांचे हक्क प्रस्तुत प्रकरणात गुंतलेले असल्यामुळे त्यांना रेकॉर्डवर न घेतल्यास त्यांचे आर्थीक नुकसार होणार आहे. सबब, मयत बिभीषण श्रीपती काळे यांचे वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी अर्जदार यांना देणे न्यायोचीत होईल. परिणामतः खालील आदेश.

## आदेश

१. नि. क्र. १४ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदारांनी आवश्यक ती दुरुस्ती तात्काळ करावी.

३. दुरुस्ती केल्यानंतर अर्जदारांनी दुरुस्ती प्रत तात्काळ दाखल करावी.

४. नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या अर्जदारांना नोटीसा काढण्यात याव्यात.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VARSHA BALVANTRAO PATIL
Date: 2022.03.16 03:37:16 +0530

दिनांक – १६.०३.२०२२

(सौ. व्ही. बी. पाटील),
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
भूम.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Devidas S. Shiral,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Smt. V. B. Patil,<br>Jt. Civil Judge, Senior Division, Bhoom, District-Osmanabad. |
| Date | --- | 16/03/2022 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 16/03/2022 |
| Order uploaded on | --- | 16/03/2022 |